श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-७, अंक-२अ | फेब्रुवारी-२०१९ विशेषांक | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |

## शृंगेरी शारदा पीठाधिष्ठित जगद्गुरू श्री विधुशेखर भारती स्वामीमहाराज यांची श्रीक्षेत्र डेरवण भेट

शृंगेरी शारदा पीठाधिष्ठित जगद्गुरू श्री विधुशेखर भारती स्वामीमहाराज यांनी आपल्या कोकणयात्रेत श्रीक्षेत्र डेरवणला भेट देऊन तेथे शिव–समर्थगडात दि. ८ ते १० फेब्रुवारी २०१९ या काळात वास्तव्य करून श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट आणि श्रीसंत सीतारामबुवा वालावलकर चॅरिटेबल ट्रस्ट यांनी धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात चालविलेल्या विविध कार्यांचे निरीक्षण केले.

शुक्रवार, दि. ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी स्वामींचे आगमन झाले, तेव्हा श्रीज्ञाननाथ मंदिराजवळ त्यांना सामोरे जाऊन पुष्पहार अर्पण करून श्रीकाकामहाराजांनी त्यांचे स्वागत केले. तेथून सजविलेल्या गाडीवरून भक्तगणांच्या गर्दीत सवाद्य मिरवणुकीने त्यांना शिव–समर्थगडात आणण्यात आले. प्रवेशद्वारी पारंपरिक वेशातील भगिनींनी त्यांना पंचारतीने ओवाळल्यावर स्वामींनी श्रीसमर्थ–श्रीराम मंदिर, श्रीमारुती मंदिर आणि श्रीदत्त मंदिरात जाऊन दर्शन घेतले.

श्री विधुशेखर भारती स्वामीमहाराज आसनारूढ झाल्यावर सर्व भक्तगण, स्त्री, पुरुष, बालके यांनी स्वामींचे दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद प्राप्त केले आणि त्यानंतर पाद्यपूजेचा सोहळा सुरू झाला. श्रीकाकामहाराजांनी श्रींच्या पादुकांची यथासांग पूजा केल्यावर या स्थानातील गुरुपरंपरेविषयी सविस्तर माहिती श्रीस्वामींना कथन केली. नंतर सर्वांना आशीर्वाद देऊन आपल्या नित्य सायंआन्हिकांसाठी



*शृंगारलेल्या गाडीवर आरूढ शृंगेरी शारदा पीठाधीश जगद्गुरू श्री विधुशेखर भारती स्वामीमहाराज*

स्वामी आपल्या निवासस्थानी गेले. या काळात मारुतीमंदिराच्या बाजूच्या प्रशस्त सभागृहात स्वामींच्या साहाय्यक सेवकांनी स्वामींच्या देवस्थानाची स्थापना केली आणि स्वामींनी तेथे येऊन नित्य सायंपूजा केली. तो सोहळा अत्यंत नेत्रसुखद होता. यानंतर जमलेल्या सुमारे तीनशे भक्तगणांना प्रसाद देण्यात आला आणि पहिल्या दिवसाचा कार्यक्रमाची सांगता झाली.



*पुष्पहार अर्पण करून स्वामीजींचे स्वागत करताना श्रीकाकामहाराज, श्री. माधवराव काजरेकर आणि अन्य*

दुसऱ्या दिवशी, शनिवारी सकाळी ब्रह्मवृंदाने स्वामींच्या देवस्थानात अभिषेकाला सुरुवात केली. या वेळी स्वामींनी स्वत: सर्वांना तीर्थ देऊन आशीर्वाद दिले आणि त्यानंतर ते रुग्णालयाच्या आवारातील श्रीगणेश मंदिरात आले. तेथे त्यांनी फुले, दुर्वा आणि महावस्त्र अर्पण करून श्रीगणेशाची पूजा केली. या गणपतीचे माहात्म्य सांगताना, ही मूर्ती सुमारे दोनशे वर्षांपूर्वी या जागेचे मूळ मालक श्री. शेंबेकर यांनी काशीपासून मस्तकी धारण करून येथे कशी आणली या विषयी माहिती देण्यात आली. त्याच अनुषंगाने रुग्णालयाच्या विस्ताराच्या वेळी श्री. शेंबेकर आणि आजूबाजूच्या वस्तीचे पुनर्वसन त्यांना सुंदर नवी घरे बांधून देऊन आणि वेगळा भरपूर मोबदला देऊन



*शिव-समर्थगडाच्या प्रवेशद्वारी श्रीस्वामींचे आरती ओवाळून स्वागत*

कशा प्रकारे करण्यात आले याची माहिती श्रीकाकांनी स्वामींना सांगितली. त्यानंतर 'मल्टिपर्पझ हॉल'मध्ये आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी जगद्गुरूंसमोर एक सादरीकरण केले. यामध्ये दोन्ही ट्रस्टनी आरोग्य, शिक्षण, क्रीडा, समाजसेवा आदी क्षेत्रात केलेल्या कामाची माहिती विस्ताराने दाखविण्यात आली. हे सादरीकरण पाहून स्वामींनी आपली प्रसन्नता व्यक्त केली. ट्रस्टच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जगद्गुरूंनी बालवाडीच्या वर्गात जाऊन छोट्या मुलांना आशीर्वाद दिले आणि शाळेच्या बंदिस्त क्रीडागृहात विद्यार्थ्यांच्या मल्लखांबावरील थरारक कसरती पाहिल्या. काही विद्यार्थिनींनी योगासनांची प्रात्यक्षिके स्वामींसमोर सादर केली.



*मल्लखांबाचे प्रात्यक्षिक पाहताना श्रीस्वामीजी, सोबत श्रीकाकामहाराज आणि अन्य*

डेरवणच्या भव्य क्रीडासंकुलाची स्वामीजींनी अत्यंत आस्थापूर्वक पाहणी केली. शूटिंग रेंजमधील सरावाची शस्त्रे, सरावाच्या पद्धती, खेळाडूंचे विशिष्ट पोशाख आदींची अगदी बारकाईने पाहाणी करून स्वामीजींनी जिम्नॅशियमचे बंदिस्त क्रीडांगण, जलतरण तलाव, देशी खेळांचे बंदिस्त मैदान, धनुर्विद्येची प्रात्यक्षिके आदी गोष्टींचे लक्षपूर्वक निरीक्षण केले. 'सिंथेटिक रनिंग ट्रॅक' पाहून तर जगद्गुरू फारच प्रभावित झाले. मेडिकल कॉलेजच्या मुलांचे अभिवादन



*श्रीसमर्थ-श्रीराम मंदिरात स्वामीजी*

स्वीकारून, कॉलेजची पाहाणी करून नंतर स्वामींनी हॉस्पिटलची प्रत्यक्ष पाहाणी करून माहिती घेतली. तेथून स्वामीसमर्थ उद्यानातील श्रीआद्यशंकराचार्यांच्या मंदिरात जाऊन सद्गुरूंचे दर्शन घेऊन स्वामी शिव-समर्थगडात प्रविष्ट झाले. शिव-समर्थ मंदिर पाहून नंतर गडातील सर्व शिवचरित्र सांगणारी शिल्पे पाहून त्यांच्यामागील ऐतिहासिक कथा त्यांनी समजून घेतल्या. येताना स्वामींनी गोशाळाही पाहिली.



*श्रीकाकामहाराजांच्या हस्ते पाद्यपूजा*

स्वामी जेव्हा श्रीराम मंदिरासमोरील सभागृहात येऊन स्थानापन्न झाले त्या वेळी भक्तगणांच्या विनंतीला मान देऊन त्यांनी उपदेशात्मक असे प्रवचन करून सर्व भक्तगणांना प्रवचनाअखेरी स्वहस्ते तीर्थ दिले.



*स्वामीजींकडून श्रीकाकामहाराजांना प्रसाद अर्पण*



*आपल्या गुरुपरंपरेविषयी स्वामीजींना माहिती देताना श्रीकाकामहाराज*



*जगद्गुरू श्री विधुशेखर भारती स्वामीमहाराज सायंपूजा करताना*



*श्रीगणेश मंदिरात स्वामीजी*



*संस्थेच्या कार्याविषयीचे सादरीकरण पाहताना स्वामीजी,*
*सोबत श्रीकाकामहाराज आणि डॉ. सुवर्णा पाटील*



*बालवाडी वर्गात श्रीस्वामीजी*




*शूटिंग रेंजमध्ये शस्त्रे पाहताना श्रीस्वामीजी आणि वे.मू. फडकेगुरुजी*



*स्वामीजींच्या सेवकांनी टेबल टेनिसचा एक डाव खेळून पाहिला.*



*श्रीकाकांसमवेत श्रीस्वामीजी जलतरण तलावाची पाहणी करताना, सोबत श्रीकांत पराडकर, क्रीडा संचालक*



*आपल्या सेवकांसमवेत सिंथेटिक ट्रॅकची बारकाईने पाहणी करताना श्रीस्वामीजी*




*भ.क.ल. वालावलकर मेडिकल कॉलेजमध्ये श्रीकाकांसमवेत पाहणी करताना श्रीस्वामीजी*



*शिव-समर्थ उद्यानात श्रीआद्यशंकराचार्य मंदिराकडे जाताना श्रीस्वामीजी*



*शिव-समर्थगडाच्या सभागृहात ऐतिहासिक शिल्पचित्रे पाहताना श्रीस्वामीजी*



*जगद्गुरू श्री विधुशेखर भारती स्वामीमहाराज भक्तगणांना उपदेश करताना*

# शृंगेरी शारदा पीठाधिष्ठित जगद्गुरू
# श्री विधुशेखर भारती स्वामीमहाराज यांचा अल्पपरिचय

स्वामी महाराजांचा जन्म तिरुपती येथे २४ जुलै १९९३ रोजी सौ. सीता नागलक्ष्मी आणि श्री. कुप्पा शिवसुब्रमण्य अवधानी या दांपत्याच्या पोटी झाला. तो नागपंचमीचा पवित्र दिवस होता. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव श्री. कुप्पा व्यंकटेशप्रसाद शर्मा. पाचव्या वर्षी स्वामीजींचे उपनयन संस्कार झाले आणि वेदाध्ययनाला प्रारंभ झाला. आजोबा, ख्यातनाम वैदिक पंडित 'श्री. कुप्पा रामगोपाल वाजपेय -याजी' आणि वडील 'श्री. कुप्पा शिवसुब्रमण्य अवधानी (जे आता तिरुमल तिरुपती देवस्थान वेद पाठशाळेचे प्रमुख आचार्य आहेत) यांच्यासारखे व्युत्पन्नमती गुरू त्यांना लाभले आणि अत्यंत द्रुतगतीने स्वामींनी आपले अध्ययन सुरू केले. २००६ साली प्रथम स्वामीजी शृंगेरी पीठात दर्शनासाठी गेले आणि तेथील वातावरणाने भारून गेले. २००९ साली त्यांनी परमहंस परिव्राजकाचार्य जगद्गुरू भारतीतीर्थ महास्वामींना शास्त्रांचे अध्ययन करण्यासाठी आपला शिष्य म्हणून स्वीकार करण्याची विनंती केली आणि त्यांची असामान्य बौद्धिक क्षमता आणि समर्पित वृत्ती पाहून महास्वामींनी त्यांचा आनंदाने स्वीकार केला. महास्वामींनी त्यांना स्वतःच तर्क आणि न्यायशास्त्र शिकविले.

स्वामींचे अध्ययनासाठीचे कठोर परिश्रम, व्रतस्थ आचरण, समर्पित वृत्ती, विद्वत्ता या साऱ्याचा विचार करून जगद्गुरू भारतीतीर्थ महास्वामींनी आपले उत्तराधिकारी म्हणून त्यांची निवड केली आणि २२, २३ जानेवारी २०१५ रोजी 'शिष्य स्वीकार समारंभा'त स्वामींनी संन्यास धर्माची दीक्षा स्वीकारली. महास्वामींनी त्यांना 'श्री श्री विधुशेखर भारती स्वामी' असे योगपटलावरील नाव दिले. ते सदतिसावे शंकराचार्य आहेत.

या नावामागे एक हृद्य कहाणी आहे. जगद्गुरू भारतीतीर्थ महास्वामींना आपले सद्गुरू 'श्रीचंद्रशेखर भारती स्वामीमहाराज' यांचे नाव आपल्या शिष्याला द्यायचे होते. परंतु आपल्या शिष्याला संबोधताना आपल्या सद्गुरूंचे नाव कसे घ्यायचे अशा संकोचाने, संस्कृतमध्ये 'चंद्र' या नावाचा दुसरा पर्याय 'विधु', तो स्वीकारून महास्वामींनी आपल्या शिष्याचे नामकरण 'श्री विधुशेखर भारती स्वामीमहाराज' असे केले आहे.



*श्रीकाकामहाराजांना तीर्थ देताना श्रीस्वामीजी*



*श्रीकाकामहाराजांचा शाल घालून सत्कार करताना श्रीस्वामीजी*

# जगद्गुरू श्री विधुशेखर भारती स्वामीमहाराज यांचे प्रवचन



*जगद्गुरू श्री विधुशेखर भारती स्वामीमहाराज भक्तगणांना उपदेश करताना*

‘‘प्रत्येक माणसाने जीवनात आपल्या अंगी काही चांगल्या गोष्टी बाणवल्या पाहिजेत. त्या शिवाय तो मनुष्य म्हणवून घेण्याला पात्र ठरत नाही. परोपकार ही अशीच एक चांगली गोष्ट आहे जी प्रत्येकाने अंगीकारली पाहिजे. शास्त्रात धर्म म्हणजे काय आणि अधर्म म्हणजे काय याचा बराच विचार आलेला आहे. आणि त्याचा निष्कर्ष असा आहे की ‘परोपकार: पुण्याय । पापाय परपीडनम् ।।’ दुसऱ्यावर उपकार करणे हा धर्म आणि दुसऱ्याला कष्ट, त्रास देणे हा अधर्म. हेच धर्म आणि अधर्माचे स्वरूप आहे. उपकाराचे अनेक प्रकार आहेत. ज्याला जे हवे ते त्याला देणे म्हणजे उपकार. भुकेल्याला अन्न देणे हा उपकार आहे. गरजूला धन देणे हा उपकार आहे. दुसऱ्याला संस्कार प्रदान करणे हाही उपकाराचाच भाग आहे. विद्यादान हाही फारच मोठा उपकार आहे. अनेक प्रकारे उपकार करता येतात. प्रत्येकाने दुसऱ्यावर शक्य तेवढे उपकार करणे आवश्यक आहे. उपकार करणे हे चांगले धर्माचरण आहे.

जगद्गुरू आद्य शंकराचार्यांसारख्या आमच्या अनेक महान पूर्वजांनी मानवजातीवर किती उपकार केले आहेत! प्रत्यक्ष परमेश्वरानेच गुरू शंकराचार्यांच्या रूपाने अवतार घेऊन एक एक माणसासाठी किती उपकार केले आहेत! उपकार म्हणण्यापेक्षा ‘कृपा’ म्हणणे अधिक योग्य होईल. ‘मोक्षा’सारख्या गंभीर विषयापासून अगदी सर्वसाधारण संसारी विषयांपर्यंत सर्व विषयांवर शंकराचार्यांनी मार्गदर्शन केलेले आहे. त्यांनी सांगितले आहे, ‘देयं दीनजनायच वित्तम् । नेयं सज्जनसंगे चित्तम् ।’ हा मानवजातीसाठी अत्यंत मोलाचा उपदेश आहे. दुसऱ्यांवर उपकार करा आणि सज्जनांच्या संगतीत राहा असेच त्यांनी सांगितले आहे. त्याचप्रमाणे तात्त्विक विचाराचा, मोक्षप्राप्तीचा विचारही त्यांनी सांगितला आहे.

पण त्यासाठी आपणाला ज्ञानाची आवश्यकता आहे. कारण शास्त्रात असे सांगितले आहे की ‘तस्मात यत्पुरुषो मनसाभिगच्छति । तद् वाचा वदति । तद् कर्मणा करोति ।’ म्हणजे आमच्या मनात, बुद्धीत जो संकल्प आम्ही करतो तसे आम्ही बोलतो, तसे आम्ही आचरण करतो. आम्ही जी कृती करतो त्याचा संकल्प प्रथम बुद्धीत होतो. जो संकल्प बुद्धीत झाला त्याप्रमाणे आमचा देह आचरण करतो. आमच्या बोलण्याचा संकल्प आमच्या बुद्धीतच होतो. म्हणून आमच्या बुद्धीला चांगले ज्ञान प्राप्त झाले तर आमचे संकल्पही चांगलेच असतील. मग आमची वाणीही चांगली असेल आणि आचरणही. म्हणून मन, बुद्धी शुद्ध असली पाहिजे.

आमच्या बुद्धीतील अशुद्धता म्हणजेच अज्ञान आणि अज्ञानाचा नाश करणारी एकमेव गोष्ट म्हणजे ज्ञान. प्रकाश जसा अंध:काराचा नाश करतो तसे ज्ञान अज्ञानाचा नाश करते. ज्ञान प्राप्त झाले की बुद्धी स्वच्छ होते, मग आमचे संकल्प, आमची वाणी, आमची कर्मे चांगली, शुद्ध होतात.

बुद्धीची शुद्धी ज्ञानाने होते आणि ज्ञानप्राप्ती गुरूपदेशातून होते. श्रीमद् भगवद्गीतेमध्ये भगवंतांनी म्हटले आहे, ‘तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन: ।।’ म्हणजे सद्गुरूंकडे जाऊन, त्यांना प्रणिपात करून, सेवा करून तुमच्या मनात

जो संदेह आहे त्याविषयी जिज्ञासू होऊन प्रश्न विचारा. ही ज्ञानप्राप्त करण्याची पद्धती आहे. त्यानंतर ज्ञानसंपन्न अशा गुरूंकडून उपदेश प्राप्त होतो. मग आमचे अज्ञान नष्ट होते. मग आपल्या हातून चांगली कामे होतात. तात्पर्य ज्ञानप्राप्ती सर्वात महत्त्वाची आहे.

सामवेदातील छांदोग्य उपनिषदामध्ये एक कथा आहे- एक 'जानश्रुती' नावाचा राजा होता. तो मोठा धार्मिक होता. त्याच्या राज्यात अनेक अन्नछत्रे सुरू होती. जो येईल तो संतुष्ट होऊन जायचा. थोडक्यात, हाच स्वर्ग आहे असे वाटावे असे त्याचे राज्य होते. एक दिवस आपल्या महालाच्या सौधावर तो उभा असताना वरून आकाशातून एक हंस पक्षांचा थवा जात होता. त्यातील एक हंस दुसऱ्या हंसाला म्हणाला, 'पुढे जानश्रुतीचा महाल आहे, त्यावरून जाऊ नको. तो महान सामर्थ्यशाली असा तपस्वी आहे. त्याच्या तप:सामर्थ्याच्या धगीने तू भस्म होऊन जाशील.' तेव्हा तो दुसरा हंस म्हणाला, 'पुढे एका झाडाखाली एक तपस्वी बसला आहे. तो याच्यापेक्षाही महासामर्थ्यशाली आहे. त्याच्या तपस्येपुढे याची तपस्या काहीच नाही. मला काही होणार नाही.' आणि तो हंस तसाच पुढे उडत गेला. त्याला काही झाले नाही.

जानश्रुतीला पशुपक्षांची भाषा येत असे. त्याने त्या पक्षांचे संभाषण ऐकले. तो अस्वस्थ झाला. आपल्यापेक्षा अधिक सामर्थ्यशाली असा कोण तपस्वी झाडाखाली बसून तपश्चर्या करीत आहे याचा त्याने शोध घेतला असता त्याला 'रैक्व' अशा नावाचा एक तपस्वी असल्याचे समजले. त्याने आपल्या दूताला त्याला घेऊन येण्यास सांगितले. दूताने राजाचा निरोप त्याला सांगताच रैक्व म्हणाला, 'मी कशाला येऊ? राजाजवळ माझे काहीच काम नाही!' शेवटी राजाच त्याच्याकडे भरपूर नजराणे घेऊन गेला आणि त्याने त्या तपस्व्याला आपणाला अनुग्रह देण्याविषयी विनंती केली. आपणाला एवढे सामर्थ्य कसे प्राप्त झाले ते मला सांगा असे विनवले. पण त्या तपस्व्याने 'आत्ता मला वेळ नाही.' असे सांगून राजाला धुडकावून लावले. असे तीन, चार वेळा झाले. अखेरीस राजाने काही नजराणे वगैरे न घेता अगदी साधेपणाने जाऊन अतिशय लीनपणे, काकुळतीला येऊन त्याची प्रार्थना केली; तेव्हा त्याने राजाला उपासना दिली. जेव्हा राजा धनसंपत्ती, आपले राजेपण सोडून शरण गेला तेव्हाच त्याला ज्ञान मिळाले.

या गोष्टीचे तात्पर्य हे आहे की धर्म, कर्म हे श्रेष्ठ असले तरी त्याहून ज्ञान हे अधिक श्रेष्ठ आहे. माणूस केवळ धार्मिक असून भागणार नाही, तो ज्ञानी असला पाहिजे. ते हंसपक्षी हे काही महर्षीच होते आणि जानश्रुतीने ऐकावे या हेतूनेच ते बोलले होते. जानश्रुतीचे त्यांच्यावर उपकार होते आणि त्याची फेड करण्यासाठीच त्यांनी असे केले. तो सर्वश्रेष्ठ धार्मिक होताच, पण तो ज्ञानी व्हावा म्हणून त्यांनी असे केले होते.

ज्ञान म्हणजे काय? आमच्या इंद्रियांना ते दिसत नाही. म्हणून कोण ज्ञानी हे ओळखणे कठीण असते. श्रीमंत माणसाची श्रीमंती दिसते. अहंकारी माणसाचा अहंकार दिसतो. पण ज्ञानी कोण आहे हे ओळखणे कठीण आहे. तो स्वत: येऊन सांगत नाही, तर आपणाला त्याला शोधावे लागते. या गोष्टीचे दुसरे तात्पर्य म्हणजे आपल्यापेक्षा कोणी अधिक ज्ञानी आहे का याचा शोध घेतला पाहिजे. मीच सर्वाधिक ज्ञानी असे मानू नये. ज्ञानाचा ध्यास घेतला पाहिजे. ज्ञानी माणसाकडे वारंवार जावे.

अज्ञान घालवण्याचे एकमात्र साधन म्हणजे ज्ञान आणि ज्ञान मिळवण्याचे एकमात्र साधन म्हणजे उपदेश. म्हणून आपण लहानपणी गुरूकडे जातो आणि ज्ञान प्राप्त करतो. कोणत्याही विषयाचे ज्ञान मिळविण्यासाठी गुरूंचे मार्गदर्शन आवश्यक आहे. भगवंतानी म्हटले आहे, 'न हि ज्ञानेन सदृश्यं पवित्रमिह विद्यते।' ज्ञानापेक्षा श्रेष्ठ आणि पवित्र काही नाही. खेळ असो की वेदांत, शिकविणारा गुरू लागतोच. मोठ्यांकडून मार्गदर्शन, संस्कार प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

आपला विषय उपकारावरून सुरू झाला. विद्या, अन्न, संपत्ती, संस्कार देणे हे उपकारच आहेत. लोककल्याणाकरिता यज्ञयाग, वेदपारायण करणे हे ही उपकारच. भगवान गीतेमध्ये सांगतात की आपण जेव्हा परमेश्वराला काही द्रव्य अर्पण करतो, हवन करतो तेव्हा तो संतुष्ट होऊन आपणाला फल प्रदान करतो. हे एक चक्र आहे. भगवंतांनी म्हटले आहे, 'एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह य: । अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ।।' म्हणजे हे चक्र फिरण्यासाठी जे आपले कर्तव्य करीत नाहीत त्यांचे जीवन व्यर्थ आहे. म्हणून एखादे काम करण्यासाठी आमचे प्रयत्न आवश्यक आहेत, गुरूंचे मार्गदर्शनही आवश्यक आहे आणि ईश्वराची कृपा सुद्धा! रथाला जशी दोन चाके असतात आणि दोन्ही आवश्यक असतात तसेच मानवी प्रयत्न आणि ईश्वरी कृपा ही दोन्ही कार्य यशस्वी होण्यासाठी आवश्यक आहेत. शेतकऱ्याने शेतात कष्ट केले, पण पाऊस पडला नाही तर काही उपयोग नाही आणि नुसता पाऊस पडला पण शेतकरी शेतात गेलाच नाही तरी पीक येणार नाही. कधी प्रयत्न करूनही काही मिळत नाही. कारण ईश्वरी कृपा नाही आणि कधी ईश्वरीकृपा आहे म्हणून बसल्याजागी सर्वकाही मिळते.

एकदा एका माणसाने एका सापाला एका पेटीत घालून बंद करून ठेवला. साप भुकेने मरणोन्मुख झाला. पण एक उंदीर तेथे आला आणि त्याने पेटीत काही खायला मिळेल म्हणून पेटीला भोक पाडून आत प्रवेश केला. भुकेल्या सापाने उंदराला खाल्ले आणि त्यानेच पेटीला पाडलेल्या बिळातून बाहेर पडून स्वत:ची सुटका करून घेतली. सापाचे नशीब चांगले म्हणून तो बाहेर पडला आणि उंदराने आत प्रवेश करून आपले प्राण गमावले.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**

श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१

ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

म्हणून आपण प्रयत्नसुद्धा करावेत आणि त्याचबरोबर ईश्वरीकृपा व्हावी म्हणूनही प्रयत्न करावेत. ईश्वरीकृपेसाठी अन्नदानासारखे परोपकारी काम करावे. उपकार करताना परतफेडीची अपेक्षा नको. 'दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।' भगवंत म्हणतात की दान करणे हे माझे 'कर्तव्य' आहे असे समजून केलेले दान हे सर्वश्रेष्ठ दान.

जेव्हा हनुमंत लंकेत जाऊन सीतामाईंचा शोध लावून, लंकादहन करून आले, तेव्हा श्रीरामांनी त्यांना प्रेमाने आलिंगन दिले आणि ते म्हणाले की यापेक्षा माझ्यावर आणखी मोठा उपकार कोणी करू शकणार नाही. मात्र ते पुढे ते म्हणाले की माझ्यावर केलेले हे उपकार तू विसरून जा. प्रत्युपकाराची अपेक्षा मनात ठेऊ नकोस कारण तुझ्यावर प्रत्युपकाराची संधी मला मिळणे म्हणजे तुझ्यावर काहीतरी संकट कोसळणे! ते मला नको आहे, म्हणून तू हे उपकार विसरून जा!

सामर्थ्य असेल तर उपकार करावेत, नसेल तर स्वस्थ बसावे; मात्र अपकार करू नये. हाच खरा धर्म आहे. या स्थानात असे काम अनेक वर्षांपासून सुरू आहे. येथील रुग्णालय, शाळा, कॉलेज हे सारे प्रशंसनीय आहे. समाजासाठी फार मोठे काम येथे सुरू आहे. पुण्या-मुंबईत मोठी शाळा, कॉलेजीस चालवणे सोपे आहे. पण अशा खेड्यात जेथे लोकांना त्याची खरोखरच जास्त गरज आहे, तेथे ते चालविणे अत्यंत प्रशंसनीय आहे.

येथे सुरू असलेल्या कार्याला आणि ते करणाऱ्या सगळ्यांना मी आशीर्वाद देतो की हे काम असेच सदैव होत राहो; यासाठी भगवती शारदादेवी आणि भगवान चंद्रमौलिश्वर आणि माझे गुरू जगद्गुरू श्री भारतीतीर्थ महास्वामी यांची कृपा आपणावर सदैव राहो. हे सर्व काम निर्विघ्नपणे सुरू राहो. ईश्वरीकृपेने सर्व विघ्नांचा नाश होवो!

मी आत्ता अशोकजींना म्हटले की जे काम सरकारने करायला हवे ते आपण श्रद्धेने करीत आहात. हे अत्यंत प्रशंसनीय आहे. अर्थात सरकारकडून हे काम चांगले होईल की नाही हे संदिग्धच आहे. पण आपण ते अत्यंत उत्तम तऱ्हेने करीत आहात. परमेश्वर आणि आपले सद्गुरू यांचा कृपाहस्त आपणावर आहे ही आनंदाची गोष्ट आहे. म्हणून पुन्हा एकदा मी सांगतो की हे कार्य ईश्वरीकृपेने निर्विघ्नपणे होत राहो असा माझा आशीर्वाद आहे. श्री अशोक रघुनाथ जोशी यांना मी विशेषरूपाने नारायणस्मरणपूर्वक आशीर्वाद देत आहे.

आमचे गुरूदेव दोन वेळा येथे येऊन गेले. भगवती शारदादेवी आणि भगवान चंद्रमौलिश्वराची पूजा करून सर्वांवर त्यांनी अनुग्रह केला. त्या नात्याने आम्हीही आमच्या या यात्रेत येथे आलो आणि आपण दाखविलेल्या आदर आणि भक्तीमुळे खूप प्रसन्न होऊन नारायणस्मरणपूर्वक आशीर्वाद देत आहोत की सर्व सज्जनांना भगवती शारदादेवी, भगवान चंद्रमौलिश्वर आणि आमचे सद्गुरू यांची कृपा प्राप्त व्हावी.

॥ पार्वतीपतये हर हर महादेव ॥

या प्रवचनानंतर उपस्थित भक्तगणांना महाप्रसाद देण्यात आला. दुपारी स्वामीजींनी दापोलीसाठी प्रस्थान ठेवले. रात्री परत आल्यावर नित्य सायंपूजेचा सोहळा चारही वेदांचे पठण, नृत्यगायनादी अष्टसेवांसह झाल्यावर दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

तिसऱ्या दिवशी रविवारी, वसंत पंचमी निमित्त स्वामींच्या देवस्थानातील सुवर्णाच्या 'श्रीयंत्रा'ची पूजा करण्यात आली सुमारे सहा तास हा पूजाविधी सुरू होता. त्यावेळी स्वामीजींचे एक सेवक आणि श्री. सुधाकर जाधव यांनी सुस्वर भजने गाऊन श्रीचरणी गानसेवा समर्पीत केली. स्वामीजी सकाळी गुहागरला जाऊन व्याडेश्वर आणि दुर्गादेवी यांचे दर्शन घेऊन परत आले आणि निरोप घेताना त्यांनी श्रीकाकामहाराजांचा शाल घालून सत्कार केला. सर्व उपस्थितांना प्रसाद दिला. श्रीकाकांनी संस्थेतर्फे स्वामींसोबत असलेल्या ब्रह्मवृंदाची आणि सेवकवर्गाची यथोचित संभावना केली. निघताना पुन्हा एकदा स्वामींनी, 'येथील काम पाहून मी प्रसन्न झालो आहे. येथे उत्तम काम सुरू आहे. आपल्या वाट्याला आलेले काम मनापासून करण्याने आनंद प्राप्त होतो' अशा शब्दात सर्वांचा निरोप घेतला.

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.

**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर